मासिक
# स्वराज दुनिया
संपादक : शिवाजी बबन खेडकर मो. नं. ८०५५७२२११०
RNI No. : MAHMAR/2024/89748
DECL NO : SDM/SR/06/2024 Dt. : 16/02/2024
unoindia1977@gmail.com
वर्षे २ रे | अंक ७ | सप्टेंबर२०२५ | मुल्य : २५ रु | वार्षिक वर्गणी : २५० रु. | पान ४

# आज देशाला नेत्याची नाही तर कार्यकर्त्याची गरज - ॲड. अजित देशमुख

**पुणे-(प्रतिनिधी)** - देशात आज समाजाचे प्रबोधन होणे आवश्यक आहे. लोकविकास आणि लोकशिक्षण गरजेचे झाले असून त्यासाठी कार्यकर्त्यांनी अहोरात्र प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यामुळे स्वराज्य जनजागृती परिषदेच्या माध्यमातून आपल्याला लोकशिक्षण आणि लोकजागृतीची चळवळ उभी करावयाची आहे. व्यक्तीला नव्हे तर भ्रष्ट व्यवस्थेला विरोध या तत्त्वाने ही संघटना चालणार असून जास्तीत जास्त कार्यकर्त्यांनी या संघटनेत सहभाग नोंदवावा. आज नेत्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे देशाला आज नेत्याची नाही तर कार्यकर्त्याची गरज असलचे प्रतिपादन स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी केले.

पुणे येथील मध्यवस्तीत असलेल्या गांजबे चौकातील पत्रकार संघाच्या भवनांमध्ये सुंदर असा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात ॲड. पुढे म्हणाले की, कार्यकर्ते उभे करण्यासाठी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सक्रिय होणे आवश्यक आहे. राज्य जिल्हा तालुका स्तरापर्यंत लवकरात लवकर पोहोचण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे पदाधिकाऱ्यांसोबत कार्यकर्त्यांनी देखील संघटन वाढीसाठी प्रयत्न करावेत. कार्यकर्त्यांना घडवण्यासाठी मेहनत



घेतली जाईल. कार्यकर्त्यांना काम कसे करावे, याचे प्रशिक्षण देखील वेळोवेळी दिले जाईल, असेही ॲड. देशमुख यावेळी म्हणाले. परिषदेचे उपाध्यक्ष संदीप जगताप (सातारा) यांनी यावेळी आपले मत व्यक्त करत असताना समाज प्रबोधनाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी वेगवेगळ्या माध्यमातून कार्यकर्त्यांनी कसा संपर्क ठेवावा, याविषयी मार्गदर्शन करत कार्यकर्ता ताठ मानेने उभा राहिला तरच समाज जागृत होईल, असे म्हटले. माजी अप्पर जिल्हाधिकारी के. सौ. कारकर हे यावेळी प्रमुख पाहुणे व

मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

त्यांनी कार्यकर्त्यांनी एक पंचसूत्री ठरवावी आणि त्या पंचसुत्रीचे पालन करुन समाजामध्ये चांगली प्रतिमा निर्माण करणारे कार्यकर्ते तयार करावेत, असे प्रतिपादन केले तर यावेळी प्रा. महादेव घुले यांनी वेळ देणारे कार्यकर्ते चळवळीत आले तर चळवळ यशस्वी होते, असे सांगितले.

सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. घुगे सर यांनी देशात लोकांमध्ये पसरत चाललेला अनुत्साह थांबवण्यासाठी कार्यकर्त्यांनी जनतेमध्ये जावे, असे म्हटले. यावेळी अनेक वक्त्यांचे छोटे खाणी विचार देखील ऐकून घेण्यात आले. पुणे विभागातील सोलापूर, सांगली सातारा, कोल्हापूर आणि पुणे या पाच जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचा हा मेळावा यशस्वी करण्यासाठी परिषदेचे कोषाध्यक्ष शिवाजीराव खेडकर यांनी मेहनत घेतली. त्यांना तुषार कुटे, महेश अजनबी मध्यप्रदेश यांच्यासह इतरांनी मदत केली. पाचही जिल्ह्याच्या प्रतिनिधींनी या मेळाव्याला हजेरी लावली. पुण्यातील एक उत्कृष्ट कार्यक्रम या निमित्ताने पार पडला. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि प्रतिमा पूजन करुन कार्यक्रमाला सुरुवात झाली. यावेळी श्री. गणेश सातव यांनी सूत्रसंचालन चांगल्या पद्धतीने पार पाडले. तर आभार प्रदर्शन सचिन थोरात यांनी केले. राष्ट्रगीतानंतर मेळाव्याची सांगता झाली.

---

# व्यवस्था परिवर्तनासाठी स्वराज्य जनजागृती परिषदची स्थापना पुण्यात पहिला विभागीय मेळावा

**शिक्रापूर / मंगलताई सासवडे**

भ्रष्टाचाराविरुद्ध आणि समाजजागृतीसाठी आयुष्यभर लढा देणारे, ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या प्रेरणेने स्वराज्य जनजागृती परिषद या नव्या सामाजिक संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. या परिषदेच्या माध्यमातून लोकशक्षक, लोकजागृती व व्यवस्था परिवर्तन या उद्दिष्टांसाठी कार्य केले जाणार आहे. यासंदर्भात परिषदेचा पहिला विभागीय मेळावा रविवारी पुण्यातील पत्रकार भवन येथे पार पडला. मेळाव्यात




ध्येय, उद्दिष्टे व पुढील कार्ययोजना यावर चर्चा करण्यात आली. तसेच जुन्या-नव्या कार्यकर्त्यांचा उत्सुर्त सहभाग दिसून आला. या प्रसंगी अध्यक्ष अजित देशमुख, सेवानिवृत्त अप्पर जिल्हाधिकारी के.सि. कारेकर, संदीप जगताप, मारुती घुले, डॉ. मिलिंद भोसुरे, घुगे सर आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले. मेळाव्यास पाच जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. अण्णा हजारे यांच्या प्रकृतीमुळे मागील काही वर्षापासून भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यासाचे काम संथ गतीने सुरु होते. मात्र त्यांच्या प्रेरणा व आशिर्वादाने स्वराज्य जनजागृती परिषद आता जोमाने आणि नेटाने व्यवस्था परिवर्तनाच्या कार्याला गती देणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमासाठी कोषाध्यक्ष शिवाजीराव खेडकर यांनी मेहनत घेतली. यो वळी महेश अजनबी मध्यप्रदेश हे उपस्थित होते.

---

# तोपर्यंत मुंबई सोडणार नाही

## मनोज जरांगे पाटील मुंबईत दाखल

**मुंबई** : मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण सुरू केले आहे. मनोज जरांगे यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी राज्यभरातून लाखो मराठा आंदोलक मुंबईत दाखल झाले आहेत. यामुळे मुंबईत मोठी गर्दी झाली असून, याचा वाहतुकीवर परिणाम झाल्याचे पाहायला मिळत आहे.

दरम्यान, उपोषण सुरू करण्यापूर्वी जरांगे पाटील यांनी उपोषणास परवानगी दिल्याबद्दल कौतुक केले. पण जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत मुंबई सोडणार नसल्याचे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले आहे. याचबरोबर जरांगे पाटील यांनी मुंबईत राज्यभरातून आलेल्या आंदोलकांना शांततेचे आवाहन करत, दगडफेक किंवा जाळपोळ करू नये, असे म्हटले आहे.

यावेळी बोलताना जरांगे पाटील म्हणाले की, कोणीही विसरू नका की आपण समाजासाठी आलो आहोत. आपण लोकांच्या बुद्धीने लालच करून समाजाचे ७० वर्षे वाटोळे केले.

---

# कुणबी, मराठा कुणबीना ओबीसी यादीतून वगळा

## मृणाल ढोले - पाटील यांची मागणी

**पुणे** : राज्यघटनेच्या तरतुदींनुसार आरक्षणासाठी केवळ सामाजिक मागासलेपण पुरेसे नाही तर अपुरे प्रतिनिधीत्वाचे निकषही महत्त्वाचे आहेत. त्या आधारे कुणबी, मराठा कुणबी आणि कुणबी मराठा यांना इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) यादीतून वगळावे, अशी मागणी ओबीसी कार्यकर्ते मृणाल ढोले - पाटील यांनी पत्रकाद्वारे केली.

या संदर्भात राज्य मागासवर्ग आयोगाच्या सदस्य सचिन आशाराणी पाटील यांना सविस्तर निवेदन दिले असून, त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील प्रतिनिधीत्वाची आकडेवारी सादर केली आहे. पुणे व पिंपरी - चिंचवड जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या यामधील ओबीसी आरक्षीत जागांपैकी तब्बल पन्नास टक्के आरक्षित जागांपैकी तब्बल पन्नास टक्के जागा कुणबी उमेदवारांनी व्यापल्या आहेत.

कुणबी समाजाला पुरेसे प्रतिनिधीत्व मिळाल्याचा हा निर्विवाद पुरावा असून त्यांना ओबीसी आरक्षणाचा हक्क नाही. त्यामुळे ओबीसी यादीतून वगळण्यात यावे, असे निवेदनात नमूद असल्याचे त्यांनी सांगितले.

---

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर २९ गुंड तडीपार

**पुणे** : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील २९ गुंडांना तडीपार करण्यात आले आहे. परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त सोमय मुंढे यांनी बाणेर, चतुः शृंगी, येरवडा, चंदननगर, खराडी, वाघाली, लोणीकंद परिसरातील २६ सराइतांना, तर परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी कात्रज भागातील तीन गुंडाना तडीपार करण्याचे आदेश दिले.

परिमंडळ चारमधील तडीपार केलेल्या गुंडांची नावे पुढीलप्रमाणे - शिवाजी लक्ष्मण रामावत (वय ३० रा.लमाणतांडा,पाषाण), सचिन अशोक रणपिसे (वय २० रा. लक्ष्मीनगर, येरवडा), सुरज उर्फ किल्या वैलास बाणेकर (वय ३५ रा. येरवडा), मोहम्मद उर्फ रहिम रहेमान शेख (वय १९ रा. येरवडा), सलमान चाँदबाशा शेख (वय ३० रा. वाघोली) महेश बलभिम सरोदे (वय २२ रा. येरवडा) सुंदर उर्फ कुबड्या राजाराम मेत्रोळ (वय ३५ रा. पर्णकुटी येरवडा), नंदकुमार संजय पासंगे (वय २२ रा. कामराजनगर येरवडा) आशा सिताराम राठोड (वय ४८, रा. येरवडा) शांताबाई गोविंद राठोड (वय ५० रा. नाईकनगर, येरवडा) नीता सुनील नगरकर (वय ६३ रा. वडगावशेरी) गणेश प्रकाश जाधव (वय १९ रा. बाणेर) प्रेम विकी ससाणे (वय १९ रा. येरवडा) मानकीबाई कमलेश चव्हाण (वय ५० रा. येरवडा), सोनीबाई बासू राठोड (वय ६०, येरवडा) मुन्नीबाई रेड्डी राठोड (वय ५० रा. नाईकनगर, येरवडा)

अंबु राजू धोत्रे (वय ४९ रा. गोखलेनगर) गणेश उत्तम वाघमारे (वय २२ रा. चंदननगर) निलेश राहूल वाघमारे (वय २५ रा. थिटे वस्ती, खराडी) सत्यम राजू चमरे (वय २४ रा. पेरणे, हवेली) मोहम्मद हुसेन खान (वय २२ रा. गाडीतळ, येरवडा) गोपाळ संजय यादव (वय २६ रा. बकोरी रोड, वाघोली), शशि पांडू चव्हाण (वय ४२ रा. नाईकनगर, येरवडा) मोहन बागीवान जाधव (वय ४१ रा. जनवाडी, गोखलेनगर) हबीब इबालु इराणी (वय २३ रा. इराणीवस्ती, शिवाजीनगर) कमल सुभाष चव्हाण (वय ३६ रा. नाईकनगर, येरवडा)

**१०० सराइतांवर नजर**

परिमंडळ चारच्या हद्दीतील १०० हून अधिक सराइतांच्या हालचालीवर पोलिसांनी नजर ठेवली आहे. त्यांच्याविरूद्धही लवकरच प्रतिबंधक कारवाई केली जाणार आहे. तडीपार केलेले आरोपी पुन्हा शहरात आल्यास त्वरीत जवळच्या पोलीस ठाण्यात माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कात्रजमधील तीन गुंड तडीपार

कात्रज भागातील तीन सराईत गुन्हेगारांना शहर आणि जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी दिले. अभय उर्फ सोन्या अशोक निसर्गंध (वय २०, रा. सिद्धीविनायक कॉलनी, आंबेगाव खुर्द), विनोद दिलीप धरतीमगर (वय २२, रा. आंबेगाव बुद्रुक), प्रथमेश उर्फ अभय देविदास कुडले (वय २१, रा. दत्तनगर, आंबेगाव बुद्रुक) अशी तडीपार केलेल्या गुंडांची नावे आहेत. तिघांना पुणे शहर, जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.. तिघांना शहर आणि जिल्ह्यातून तडीपार करण्याचा प्रस्ताव आंबेगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने यांनी तयार केला होता.

# संपादकीय

## 'एआय'चे सहअस्तित्व

विजय सुब्रमणियन नावाच्या निर्मात्याने 'एआय'चा वापर करून 'चिरंजीवी हनुमान' हा चित्रपट तयार केला असून तो लवकरच प्रदर्शित होणार आहे. मात्र दिग्दर्शक अनुराग कश्यपसह अनेक जाणकारांनी त्याच्यावर टीका केली आहे 'एआय' अथवा कोणतेही तंत्रज्ञान भेदाभेद करत नसते. त्याचा वापर करणाऱ्यांचे पूर्वग्रह, मूल्ये या सहअस्तित्वाचे भवितव्य ठरवणार असतात तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी ८० च्या दशकात आणलेल्या संगणक क्रांतीमुळे नंतरच्या काळात बदलांचा जो काही झपाटा निर्माण झाला ती किरकोळ झुळूक वाटावी अशी परिस्थिती येत्या काही काळात कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच आर्टिफिशयल इंटेलिजन्स अर्थात 'एआय' आणू शकते अशी चिन्हे आहेत. पण ती दिसतील, जाणवतील ती डोळे उघडे ठेवून बघितले तरच. आपला सामाजिक अवकाश कबुतरे, हत्ती, श्वान हे पक्षीप्राणी, कोणी काय खावे अथवा खाऊ नये याविषयीचे आग्रह आणि माझी जात आणि तुझा धर्म असे वाद यांनीच व्यापलेला असताना त्यापलीकडचे जग काहीच्या काही बदलते आहे आणि त्याची आपल्याला कल्पनाही नाही. वैयक्तिक आणि सामाजिक भेदाभेद कुरवाळण्यात सारेच गढून गेले असताना कृत्रिम बुद्धिमत्ता नावाचा माणसानेच जन्माला घातलेला भस्मासुर माणसाच्या सगळ्याच जगण्याची उलथापालथ करायला निघाला आहे. त्याला कसे हाताळायचे, त्याला आपल्यावर स्वार होऊ द्यायचे की आपण त्याच्यावर स्वार व्हायचे याचे भान येण्यासाठी आधी आपले डोके ताळ्यावर हवे. ते तसे असेल तरच आजूबाजूला घडणाऱ्या घटना, होणारे बदल यांचा अर्थ उलगडू शकतो. विजय सुब्रमणियन नावाच्या निर्मात्याने 'एआय'चा वापर करून 'चिरंजीवी हनुमान' हा चित्रपट तयार केला असून तो लवकरच प्रदर्शित होणार आहे. मात्र दिग्दर्शक अनुराग कश्यपसह अनेक जाणकारांनी त्याच्यावर टीका केली आहे. सिनेमानिर्मिती हा उद्योग असला तरी त्याच्या मुळाशी अभिनय, लेखन, गायन, संगीत अशा आणखी कितीतरी कला आहेत. 'एआय'च्या एका फटकाऱ्याने या उद्योगातले कितीतरी रोजगार जाऊ शकतात आणि त्याहीपेक्षा त्यातल्या मानवी कला आणि कौशल्याची माती होऊ शकते हा त्यातला आक्षेपाचा मुद्दा आहे. तो योग्यच, पण हा रेटा कोण, कसे आणि कितीसा रोखू शकणार आहे? अलीकडच्या तरुणाईला भुरळ घातलेल्या 'सैय्यारा' सिनेमातील सर्व गाणी किशोरकुमारच्या आवाजात ऐकायला मिळणे ही 'एआय'चीच करामत. कोणतीही गाणी कोणाच्याही आवाजात, कोणत्याही ढंगात, कोणत्याही प्रकारच्या संगीतासह या 'एआय' करत असलेल्या करामतीने सध्या धुमाकूळ घातलेला आहे. तो इतका की 'बुगडी माझी सांडली गं' ही लावणी शकिरा किंवा मॅडोनासारख्या पाश्चात्त्य गायिकांच्या आवाजातही ऐकायला मिळू शकेल. 'एआय' कसे वापरायचे हे तंत्र माहीत असलेली कोणीही व्यक्ती ते करू शकेल. गीतकार गाणे लिहितो आणि निसर्गत: सुरेल गळ्याची देणगी असलेले गायक आणि काहीएक संगीतसाधना असलेले संगीतकार त्यावर मेहनत घेतात. त्यामागे अंगभूत गुण असतातच पण कौशल्य वाढवण्यासाठी वर्षानुवर्षांची मेहनत असते. 'एआय'मुळे हे सगळे एका सेकंदात करून साधना ही गोष्टच भुईसपाट ठरू शकते. आता तर अख्खा चित्रपटच 'एआय'ने तयार केला आहे. कलानिर्मिती ही माणसाच्या प्रतिभेची कमाल मानली जाते. ते काम 'एआय' करणार असेल तर माणूस काय करणार? अर्थात हा प्रश्न गुंतागुंतीचा आहे, हे 'एआय'चे इतर उपयोग पाहता लक्षात येते. उदाहरणच द्यायचे तर स्वयंपाकघरात वापरता येईल अशा 'एआय' आधारित रोबोचे आगमन परदेशात झाले आहेच, पण भारतीय बाजारपेठांमध्येही भारतीय पद्धतीचे अनेक खाद्यापदार्थ करता येतील असे 'एआय' आधारित किचन असिस्टंट किंवा रोबो येताना दिसत आहेत. ते आज भले तुलनेत प्राथमिक अवस्थेत असतील; पण केवळ आहारपद्धतीच नाही तर थेट विवाहसंस्थेतील श्रमव्यवस्थाच बदलून टाकण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे, हे नाकारता येणार नाही. गुंतागुंतीच्या भारतीय आहारसंस्कृतीने आजवर त्या त्या कुटुंबातील स्त्रीचा वेळ आणि श्रम यांच्यावर आणि पर्यायाने तिच्या व्यक्तिमत्त्वावरच घाला घातला आहे.

पण १००-१५० प्रकारचे खाद्यापदार्थ तयार करू शकणारे 'एआय'-आधारित साधन स्वयंपाकघरात असेल तर कुटुंबातील पारंपरिक श्रमविभागणीच थेट बदलून जाऊ शकते. गॅससमोरून मोकळ्या झालेल्या स्त्रीची ऊर्जा तिला आवडणाऱ्या कोणत्याही कामात लावली जाऊ शकते. स्वयंपाक हे स्त्रीचेच काम हे गृहीतकच कायमसाठी पुसले जाऊ शकते. त्यामुळे पुढच्या काही पिढ्यांनंतर कदाचित 'आईच्या हातचे' किंवा 'बायकोच्या हातचे' पदार्थ हा प्रकारच माहीत असणार नाही. नसूदे. शतकानुशतकाच्या मोठ्या दुष्टचक्रातून स्त्रीची सुटका झाल्याचे समाधान त्यापेक्षा मोठे नाही का?

तसे 'एआय'ने आपले रोजचे आयुष्य आधीच व्यापून टाकले आहे. हल्ली बाजारात आलेले 'एआय' चष्मे नुसती तोंडी आज्ञा ऐकून छायाचित्रण किंवा चलत्चित्रण करतात. त्याआधी आपल्या हातातले मोबाइल, त्यातली उपयोजने अर्थात अ‍ॅप्स, ऑनलाइन शॉपिंग, स्मार्ट वॉच, फेस रेकग्निशन, उंच इमारतींच्या लिफ्ट या सर्वांत 'एआय'चा वापर होऊ लागला आहेच. अलीकडे जाहिरात होते ती स्मार्ट घरे, येऊ घातलेल्या चालकविरहित मोटारगाड्या, ही 'एआय'ची किमयादेखील उच्च मध्यमवर्गापासून फार दूर नाही. हे सगळे बदल आपल्या आयुष्यात मांजराच्या पावलाने आले, पण यापुढच्या काळात मात्र तसे होण्याची शक्यता नाही.

संगणक क्रांतीच्या झुळकेपेक्षा इंटरनेट क्रांतीचे वारे वेगवान होते, त्याहीपेक्षा मोबाइल-स्मार्टफोन क्रांतीचा झंझावात मोठा ठरला आणि आता 'एआय' हे तर वादळ आहे. त्याने शिक्षण, मनोरंजन, उत्पादक उद्योग अशी सगळी क्षेत्रे ताब्यात घ्यायला सुरुवात केली आहे. 'एआय'मुळे कोणत्या क्षेत्रातल्या किती लोकांचे रोजगार गेले यांसारख्या बातम्याही येऊ लागल्या आहेत. अर्थात संगणक आले, तेव्हाही हीच ओरड झाली, पण संगणकाने नवे रोजगार निर्माणही केले. तसेच 'एआय'च्या बाबतीतही होऊ शकते. पण त्यासाठी समाज म्हणून आपण तयार आहोत का, हा प्रश्न आहे. तो पडण्याचे कारण म्हणजे आपल्या देशात असलेली डिजिटल दरी.

प्रचंड लोकसंख्या, गरिबी यासह इतरही कारणांमुळे असलेला शिक्षणाचा अभाव हे या दरीचे कारण आहे. आहे त्या शिक्षणपद्धतीमधून आपण आज आपल्या लोकसंख्येसाठी पुरेसे रोजगार निर्माण करू शकत नाही, अशी परिस्थिती आहे. असे असताना 'एआय'साठी आवश्यक ठरतील असे रोजगार निर्माण करणारे शिक्षण द्यायला हवे, याचा विचार आपण केव्हा करणार? केरळ हे देशातले पहिले १०० टक्के डिजिटली साक्षर राज्य म्हणून जाहीर झाले, अशी बातमी अलीकडेच प्रसिद्ध झाली आहे. याच पद्धतीने देशातल्या अगदी तळागाळातल्या तरुणाला 'एआय'साक्षर, 'एआय'सक्षम करावे लागेल.

'एआय'चे सहअस्तित्व मान्य करून अधिक चांगले कसे जगता येईल यावर काम करावे लागेल, असे या क्षेत्रातील जाणकारांचे सांगणे आहे. हे वाटते तितके सोपे नाही. कारण कमी लोकसंख्येच्या देशांमध्ये कदाचित 'एआय' हे वरदान ठरेल; पण भारतासारख्या सामाजिक- सांस्कृतिक- राजकीय पातळीवर गुंतागुंतीच्या असलेल्या देशामध्ये 'एआय' साधने कोणाच्या हातात आहेत, यावरून त्यांचा वापर कसा होईल, हे ठरू शकते. तंत्रज्ञान आणि आधुनिकता कोणतेही भेदाभेद करत नसले तरी त्यांचा वापर करणाऱ्यांचे पूर्वग्रह, मूल्ये या सहअस्तित्वाचे भवितव्य ठरवणार आहेत. म्हणूनच 'एआय' हे वादळ माणसाळवण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक होणे आवश्यक आहे.

## घ्या विकास!!

अवघ्या ४०० मिमी पावसात देशाची आर्थिक राजधानी 'धारा'तीर्थी पडत असताना आणि पावसाळ्यातील नैसर्गिक पावसाने महाराष्ट्र हतबल होत असताना महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या बैठकीत काही महत्त्वाच्या पायाभूत योजना मंजूर झाल्या. वडाळा-गेटवे ऑफ इंडिया मेट्रो, ठाणे-नवी मुंबई विमानतळ उन्नत महामार्ग, नागपुरात नवीन वर्तुळाकार मार्ग आणि नवनगर, पुणे-लोणावळा मार्गावर दोन नवीन मार्गिका, कोकणातील चिपी विमानतळावरील सेवा 'पूर्ववत' करणे आदीचा त्यात समावेश आहे. मराठीत 'पुढचे पाठ, मागचे सपाट' असा वाक्प्रचार आहे. म्हणजे नवीन, ताजे विषय ध्यानात ठेवायचे; पण त्याचवेळी जुने शिकवलेले विसरायचे. पायाभूत सुविधांच्या नवनवीन घोषणांची यादी पाहिली की या शालेय सत्याचे स्मरण व्हावे. कसे ते पहा. महाराष्ट्रातील अलीकडच्या काळातील सर्वात भव्य प्रकल्प म्हणजे 'अटल सेतू'. जवळपास २२ किमी लांबीच्या या पुलातील १६ किमी अंतर हे समुद्रातील आहे. अभियांत्रिकीचे उत्कृष्ट शिल्प असेच त्याचे वर्णन करावे लागेल. नवी मुंबईस या पुलाने थेट मुंबईशी जोडले. या पुलाचे आरेखन, त्याची उभारणी याबाबत कौतुक करावे तितके थोडेच. तथापि अभियांत्रिकीचे हे उत्कृष्ट शिल्प मुंबईतून बाहेर पडणाऱ्या वाहतुकीसाठी जेव्हा गरजेचे होते तेव्हाच बंद ठेवावे लागले. दोन दिवसांच्या पावसातील दीड दिवस हा पूल वाहतुकीस बंद केला गेला. कारण या पुलाच्या पलीकडे नव्या मुंबईतील विमानतळासाठी जी डोंगरकापणी झाली त्यामुळे पाण्याचे प्रवाह बदलून या पुलास जोडणाऱ्या महामार्गाकडे वळले. उत्कृष्ट दर्जाचे, परदेशी वाटावेत अशा प्रकारचे चार-चार मार्गिकेचे रस्ते या अटल सेतूस जोडतात. पण गेले दोन दिवस या रस्त्यांच्या चौपदरी नद्या झाल्या. या पुलाच्या नवी मुंबई बाजूकडून जवळच मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे काम सुरू आहे. त्या कामामुळे या परिसरात तसेच पुढे पालघरमध्ये पाण्याच्या प्रवाहांनी रस्ते बंद केले. म्हणजे बुलेट ट्रेन सुसाट धावणार आणि पावसाळ्यात रस्ते बंद करणार. मुंबईचे उपनगर बनलेल्या ठाणे शहराचे हाल तर कुत्राही खाणार नाही अशी स्थिती. एकाही नागरिकाने मागणी केलेली नसताना ज्या गतीने एकापेक्षा एक तथाकथित पायाभूत सुविधा प्रकल्प या शहरात आणले जात आहेत ते पाहिल्यावर 'विकास नको; पण प्रकल्प आवर' अशीच नागरिकांची भावना असणार. निवडणुकीच्या तोंडावर मोठा गाजावाजा करून तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईच्या प्रवेशद्वारावरील टोलवसुली लहान गाड्यांसाठी रद्द केली. परंतु त्यामुळे प्रवास गतिमान होण्याऐवजी अधिक दिरंगाईचा बनला. ज्यांना टोल द्यावा लागतो अशा मालमोटारी अन्य सर्व गाड्यांच्या मार्गिकेत घुसू लागल्या, परिणामी टोलच्या तोंडावरील कोंडी वाढली, हे एक कारण. आणि दुसरे असे की नवी मुंबईत टोल माफी असेल तर २५० रु. मोजून 'अटल सेतू'वरून कोण शहाणा जाईल? हे झाले लहान मोटारींचे. मोठ्या मालमोटारींसाठी नवी मुंबईचा पारंपरिक टोल अधिक सोयीचा असल्याने तेही अटल सेतू टाळतात. म्हणजे ही लाडाकोडाने उभी केलेली पायाभूत सुविधा नुसत्या उद्घाटनाच्या कौतुकापुरतीच. नवी मुंबई विमानतळ ते ठाणे, ठाणे शहराचे प्रवेशद्वार आनंदनगर ते दुसरे टोक असलेल्या कोपरी परिसरापर्यंत उन्नत मार्ग बांधले जाणार आहेत. कोणा नागरिकांनी कधी त्यांची मागणी केली होती? यापैकी नवी मुंबई परिसर हा मोठा औद्योगिक विभाग. गेले दोन दिवस त्यातील अनेक कारखाने उदयपुरातील तळ्यात असलेल्या राजमहालांसारखे भासले. सर्व बाजूंनी पाणीच पाणी. आता या औद्योगिक परिसरातील ४० टक्के जमीन निवासी बांधकामास उपलब्ध करून दिली जाणार आहे. पूर्वी ही मर्यादा २० टक्के होती. म्हणजे आता कारखान्यांच्या परिसरात टोलेजंग नागरी वसाहती. यातून ना कारखान्यांचे भले होणार ना निवासी विभागाचे. बरे, ही नागरिकांची जबाबदारी वाहायची स्थानिक शहर महापालिकांनी. आहे ते झेपत नाही अशी त्यांची स्थिती. 'जीएसटी'मुळे पालिकांच्या उत्पन्नाला तड लागलेली. त्यात आता हा नवीन भार. हे वास्तव केवळ मुंबई आणि परिसराचेच आहे असे नाही. पुणे, पुण्याजवळील हिंजवडी, नागपूर, नाशिक, औरंगाबाद आणि अन्यत्रही हेच. हिंजवडी परिसरात एकेका कारखान्यात लाख लाख कर्मचारी आहेत. त्यांना वाहून न्यायला रस्ते पुरेसे नाहीत. आता त्यात निवासी संकुले. या 'अविनाशी' बांधकाम-लालसेत कोणाचे भले होते हे नव्याने सांगण्याची गरज नाही. पण ही विकासाची हवस इतकी विकृत आहे की इमारती उभारताना स्थानिक नाले, जलप्रवाह बुजवण्यात या विकासाभिमुख सत्ताधीशांस जराही लाज वाटत नाही. परिणामी अकाली नव्हे, साध्या नियमित पावसाळ्यातला पाऊस पडला तरी या रस्त्यांचे जलमार्ग होतात. आता लवकरच मुंबई-पुणे महामार्गावरील घाटातील 'मिसिंग लिंक' वाहतुकीस खुली केली जाईल. या पायाभूत सुविधेमुळे या दोन शहरांतील प्रवास कालावधी म्हणे ३० मिनिटांनी कमी होईल. परंतु प्रश्न असा की ही वेळ कमी करा अशी मागणी कोणी केली होती काय? आणि दुसरे असे की डोंगर भेदून केलेल्या रस्त्याने ३० मिनिटे वाचवायची आणि पुण्याच्या वेशीवर हिंजवडीपासून शहरातील ईप्सित स्थानापर्यंतच्या वाहतूक गर्दीत एक तास अडकून पडायचे. हे नियोजन. नागपुरात अलीकडेच बऱ्याच रस्त्यांचे काँक्रीटीकरण केले गेले. नागपूरकरांचा श्वास या काँक्रीट रस्त्यांअभावी अडकला होता असे नाही. पण नागरिकांनी अशी काही मागणी न करता या काँक्रीटीकरणाचा घाट घातला गेला. गतसाली नागपूरची मुंबईप्रमाणे 'तुंबई'झाली. नागपूर हे साक्षात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांचे शहर. म्हणजे 'आंधळा मागतो एक डोळा' आणि 'घेता किती घेशील दो कराने' अशी स्थिती. नागपुरात त्यामुळे मेट्रोच मेट्रो आणि पूलच पूल. जुने पूल पाडायचे आणि नवीन बांधायचे! घ्या विकास!!

राज्यातील एक मेट्रो आपल्या पायावर उभी राहणे राहिले दूर, पण बरी कमाई तरी करावी; तर तेही नाही. असे असताना मुंबईत आणखी एका मेट्रोची घोषणा नुकतीच करण्यात आली. या संपूर्ण मेट्रो प्रकल्पांस सध्याच्या अंदाजानुसार किमान ३६ हजार कोटी रु लागतील. इतक्या पैशांत हजारो प्रवासी बस गाड्या आल्या असत्या आणि वर नागरिकांस मोफत प्रवास सुविधाही देता आली असती. पण मग 'विकासा'चे काय? या सर्व मेट्रो पूर्ण होण्यास पुढील किमान १० वर्षे लागतील. म्हणजे तोपर्यंत रस्ते खणणे अबाधित आणि वाहतुकीच्या कोंडीची हमी. आपले दिव्य प्रकल्प-पूर्ती अंदाज लक्षात घेतले तर सर्व मेट्रो पूर्ण होईपर्यंत नागर चित्र संपूर्ण बदललेले असेल. विद्यमान मेट्रोचे आरेखन किती द्रष्टे आहे हे पाहावयाचे असेल तर नवीन वांद्रे-कुर्ला व्यापारी परिसर हे उत्तम उदाहरण ठरावे. इतक्या बँका, वित्त कंपन्या यांची मुख्यालये या परिसरात; पण मेट्रो स्थानकापर्यंत पोहोचायचे कसे हीच येथील कर्मचाऱ्यांची भ्रांत. आता तेथे नव्या 'पॉड टॅक्सी' सुरू केल्या जाणार आहेत. म्हणजे शेकडोंना ने-आण करण्याची गरज असताना १०-२० जणांच्या वाहतुकीची सोय. या परिसरात मोठा गाजावाजा करून 'सायकल ट्रॅक' आणि 'स्कायवॉक' सुरू करण्यात आले होते. आता हे दोन्हीही उखडून टाकणे सुरू आहे. आपल्या या वाहतूक नियोजनाच्या दिशाहीनतेची तुलना परराष्ट्र धोरणाशीच होऊ शकेल. वर वाहतूक गोंधळावर टीका झाली की उड्डाण पूल घोषणा आहेतच! प्रत्येक पूल कोठेतरी संपणारच; तेव्हा तेथील वाहतूक कोंडीचे काय; याचा विचार करतो कोण? नागरिक खूश, कामे मिळतात म्हणून कंत्राटदारही खूश आणि हे सर्व सढळपणे करता येते म्हणून राजकारणी खूश. पण एक सत्य या विकासाखाली दडवता येणार नाही. अलीकडेपर्यंत आपल्या शहरांत पाणी तुंबत होते ते अनधिकृत बांधकांमांमुळे. आताचे संकट हे अधिकृत बांधकाम/इमारतींमुळे आहे. सुनियोजितपणे सुरू असलेले विकासाचे कुनियोजन आपल्या अस्तित्वाच्या मुळावर येऊ लागले आहे. आता तरी आपणास अक्कल येणार काय, हा प्रश्न.

## आत्मघातकी मार्ग टाळलेलाच बरा!

चीनचे शत्रुत्व व्यक्त आणि थेट असते. पण दोस्तीच्या चर्चेमागील शत्रुत्व गर्भित आणि अव्यक्त असते, याची प्रचीती वारंवार आलेली आहे. रशिया आणि चीन या दोन 'शत्रूं'ना धडा शिकवण्याचा विडा उचलणारे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प प्रत्यक्षात या दोन देशांना खरोखर खडे बोल सुनावण्याची वेळ येताच गर्भगळीत झाले. युक्रेनप्रश्नी रशियावर आणि व्यापारभेदप्रश्नी चीनवर निर्बंधांची तलवार उपसून ट्रम्प सज्ज होते. पण ही तलवार त्यांनी त्वेषाने चालवली, ती 'घनिष्ठ मित्र' भारतावर! बढाईखोर पुंडासमोर खरोखरच दोन सव्वापुंड प्रकटतात, त्या वेळी रग जिरवण्यासाठी नि पत राखण्यासाठी काही तरी करायचे म्हणून जवळच्याच एखाद्या निरुपद्रवी जिवाला बडवायचे तसे हे. ट्रम्प त्यांना काय करायचे ते करोत, पण त्यांनी काहीशा अनपेक्षितपणे वापरलेल्या दुहेरी टॅरिफ तडाख्यासमोर आपण हतबल आणि हतबुद्ध बनलो हे कटू वास्तव. भारताकडून आकारल्या जाणाऱ्या 'जाचक' शुल्काविषयी ट्रम्प सातत्याने तक्रारी आळवत होतेच. तरी भारतीय वस्तुमालावर २५ टक्के इतके कठोर शुल्क ते आकारतील याचा अंदाज आपल्या धुरीणांना आला नाही. त्या पहिल्या टप्प्यातच त्यांनी युरोपीय समुदाय, ब्रिटन, कोरिया, जपान यांच्या तुलनेत आपल्याला अवनत करून ठेवले. पण ट्रम्प इतक्यावरच थांबले नाहीत. भारत रशियाकडून सातत्याने भरपूर तेल खरीदतो म्हणून अतिरिक्त २५ टक्के शुल्काची धमकी त्यांनी दिली असून, ती अमलात येण्याची स्पष्ट चिन्हे आहेत. म्हणजे एकत्रित ५० टक्के आयात शुल्क भारतावर लावून या महाशयांनी आपल्याला बांगलादेश, थायलंड, फिलिपिन्स, व्हिएतनाम आणि पाकिस्तान यांच्यापेक्षाही अवनत करायचा चंग बांधला आहे. गेल्या काही महिन्यांतील आपल्या दृष्टीने या सर्वस्वी अनपेक्षित घडामोडींमुळे भारत सरकारची पंचाईत झाली आहे. हा धक्का इतका अनपेक्षित होता, की त्यामुळे आपण अमेरिकेच्या तुल्यबळ प्रतिस्पर्ध्याशी म्हणजेच चीनशी अचानक सौजन्य-सौहार्द वाढवण्यावर भर दिला आहे. ट्रम्प अत्यंत बेभरवशाचे आणि उठवळ आहेत हे तर मान्यच. पण ते नकोसे झाले म्हणून चीनला कवटाळण्याचे धोरण किती योग्य याची चिकित्सा यानिमित्ताने आवश्यक. याचे कारण गलवानच्या जखमा अजूनही ओल्या आहेत नि लडाखमधील संघर्षग्रस्त सीमावर्ती भागात दोन्ही देशांमध्ये निव्वळ गस्तीमर्यादेवर मतैक्य झाले आहे. काही माध्यमांनी या बरोबरीने सीमावर्ती व्यापाराच्या संभाव्यतेकडे नि धार्मिक पर्यटनाकडे दोन्ही देशांत संबंध सुधारल्याचे दाखले म्हणून अंगुलिनिर्देश केले आहेत. दोन्हींचे प्रमाण अदखलपात्र आहे. चीनने भारतास मध्यंतरी आक्रसवलेल्या खते, दुर्मीळ संयुगे नि महाकाय छिद्रण यंत्रांच्या पुरवठ्यावरील नियंत्रणे उठवण्याचे कबूल केले आहे. याचा अर्थ हा ऐवज घेऊन चिनी जहाजे भारतीय बंदरांमध्ये नांगर टाकून उभी आहेत असा होत नाही! भारताबरोबर काही मुद्द्यांवर मतभेद झाल्यामुळे दोन्ही देशांचे नुकसान झाले, असे नुकतेच भारतात आलेले चिनी परराष्ट्रमंत्री वँग यी बोलून गेले. तसेच, व्यापार दहशतीच्या युगात सहकार्य, सामंजस्य आणि समन्वयातून मार्ग काढावा लागेल, असेही त्यांना वाटते. पुढील महिन्यात बीजिंगला होणाऱ्या शांघाय सहकार्य परिषदेचे निमंत्रण त्यांनी पंतप्रधान मोदींच्या हाती ठेवले. मोदींनी ते स्वीकारले. पण केवळ यावरून अमेरिकेने डोळे वटारले, म्हणून चीन गोंजारेल अशी सरधोपट मांडणी किंवा स्वप्नरंजन करणाऱ्यांस सावधगिरीचा इशारा द्यावाच लागेल. कारण हेच चिनी परराष्ट्रमंत्री भारतात येण्यापूर्वी पाकिस्तानला त्या देशाकडून मिळालेल्या लढाऊ पाणबुडीचे जलावतरण करून आले. भारतातून निघून ते अफगाणिस्तानला गेले नि तेथे पाकिस्तान-अफगाणिस्तानसमवेत त्यांनी त्रिपक्षीय चर्चा केली. त्या चर्चेचा गाभा अफगाणिस्तानातून 'बेल्ट अँड रोड' हा चीनचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प विस्तारणे हा होता. भारताशी सहकार्याविषयी बोलतो तोही चीन नि हाही चीन. भारताने अद्याप अफगाणिस्तानला अधिकृत मान्यता दिलेली नाही तेथे चीन मात्र त्या देशातील प्रकल्पांविषयी चर्चा करू लागला आहे. ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानने वापरलेली ८० टक्के शस्त्रसामग्री चिनी बनावटीची होती. नजीकच्या भविष्यात त्या देशास नवीनतम लढाऊ विमाने देऊन आणखी युद्धसज्ज बनवण्याचे चीनचे मनसुबे आहेत. चीन एकीकडे सामरिक मार्गांनी भारतावर कुरघोडी करू इच्छितो, दुसरीकडे आर्थिक आघाडीवर तो आपल्यासाठी दिवसेंदिवस अपरिहार्य ठरू पाहतो. त्याने दुर्मीळ संयुगांचा पुरवठा नियंत्रित करू म्हटल्यास इकडे आपल्या वाहननिर्मिती क्षेत्राची घुसमट होते. औषधनिर्मिती क्षेत्रात आपण वारंवार स्वत:ची पाठ थोपटवून घेत असतो, पण त्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा महास्रोतही चीनच. नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात विद्युतसंचांपासून सौरपटलांपर्यंत बहुतेक घटक नि उपघटक चीनमधूनच येतात. गलवानपश्चात म्हणजे २०२० नंतर या आपल्या मुजोर शेजाऱ्यास अद्दल घडवण्यासाठी, राजनैतिक आणि लष्करी प्रतिकाराबरोबरच आर्थिक निर्बंधांचे हत्यार वापरण्याची मागणी जोरकसपणे झाली. पाच वर्षांनंतर भारत-चीन व्यापारामध्ये त्या देशाचे आधिक्य १०० अब्ज डॉलरच्या घरात गेले आहे. म्हणजे आपली तेथे होणारी निर्यात अजूनही फुटकळ आहे, उलट तेथून आपल्याकडे होत असलेली वस्तुमालाची आयात वर्षागणिक फुगत आहे. या असमतोलातून आणखी एक धोका संभवतो. आपल्यापेक्षा बलाढ्य असूनही चीनची भाषा गेल्या काही दिवसांत का बदलली हे समजून घ्यावे लागेल. अमेरिकेने त्या देशावर लादलेले आयात शुल्क सध्या स्थगितावस्थेत आहे. दोन देशांमध्ये वाटाघाटी सुरू आहेत. चीनच्या आर्थिक आणि औद्योगिक ताकदीला ट्रम्प यांनी पुरेसे जोखले नाही. त्यामुळे जबरी शुल्क लादूनही नंतर ते सौम्य करण्याची आणि मग काही काळ ते स्थगित करण्याची वेळ त्यांच्यावर आली. पण ट्रम्प यांचा काहीही भरवसा देता येत नाही. त्यामुळे वाटाघाटी फिसकटल्या आणि अमेरिकेने कठोर शुल्क लादलेच, तर एक भलीमोठी बाजारपेठ चीनसाठी प्रतिकूल ठरू शकते. अशा स्थितीत चीनच्या अव्याहत उत्पादनचक्राची भूक भागवणाऱ्या अजस्रा बाजारपेठा चीनला शोधाव्या लागतील. या निकषांवर भारताचा क्रमांक वरचा येतो. चीनने ब्रिक्स समूहाला कवटाळून ठेवले, याचे हे एक प्रमुख कारण. या समूहातील भारत, ब्राझील, आता इंडोनेशिया या बाजारपेठा चिनी मालाच्या 'निचराभूमी' ठरू शकतात. ट्रम्प यांनी हे ओळखले आहे, त्यामुळेच ब्रिक्समध्ये खोडा घालण्याचे त्यांचे प्रयत्न सतत सुरू असतात. भारताने हा धोका ओळखायला हवा. चीनचे शत्रुत्व व्यक्त आणि थेट असते. पण दोस्तीच्या चर्चेमागील शत्रुत्व गर्भित आणि अव्यक्त असते, याची प्रचीती वारंवार आलेली आहे. नेहरूप्रणीत भारताने ते ओळखले नाही, असे वारंवार बोलून दाखवणाऱ्या विद्यमान सत्ताधीशांनाही चीनने गाफील गाठून दाखवले. उत्पादन, पायाभूत सुविधा उभारणी, उत्खनन, रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षण या क्षेत्रांमध्ये आपण अनेक वर्षांमध्ये महासत्ता तर सोडाच, पण मध्यमसत्तांना साजेशी प्रगतीही केलेली नाही. आपली अर्थव्यवस्था अजूनही प्राधान्याने सेवाकेंद्री, कृषिकेंद्री, उपभोक्ताकेंद्री आहे. जागतिक व्यापार परिप्रेक्ष्यात आवाज आणि वजन हे उत्पादनाभिमुख आणि निर्यातप्रधान देशांनाच असते. ही परिस्थिती जोवर बदलत नाही तोपर्यंत आपल्यासमोर पर्याय मर्यादित असतात. अशातही डावे-उजवे करायचे झाल्यास आपल्या अधोगतीसाठी टपून बसलेल्या चीनपेक्षा लहरी पण लोकशाही अमेरिकेचा पर्याय केव्हाही उत्तम. उद्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धजन्य परिस्थिती उद्भवलीच तर चीन कोणत्या बाजूला राहील हे पुरेसे स्पष्ट आहे. अशा परिस्थितीत पाकिस्तानकडील चिनी शस्त्रास्त्रांपेक्षाही भारतात येणाऱ्या चिनी मालाची संभाव्य कोंडी अधिक चिंताजनक ठरू शकेल. तेव्हा व्यापारकोंडीच्या प्रस्तुत अगतिकतेतूनही चीनकडे वळण्याचा आत्मघातकी मार्ग टाळलेलाच बरा!

**printed by SHIVAJI BABAN KHEDKAR, and published by SHIVAJI BABAN KHEDKAR, Owner by SHIVAJI BABAN KHEDKAR on behalf of Marathi Magazine SWARAJ DUNIYA, printed at M/s. Shree Samarth Printers, Appa Balwant Chowk, Near Prabhat Theatre, 535, Shanivar Peth, Pune - 411030 (Maharashtra) and published at Property No. 2585, Gat No. 1026, Old Bhambarde Road, Ranjangaon Ganpati, Tal. Shirur, Dist. Pune - 412209 (Maharashtra) Editor - SHIVAJI BABAN KHEDKAR**

**मुद्रक शिवाजी बबन खेडकर आणि प्रकाशक शिवाजी बबन खेडकर मालक शिवाजी बबन खेडकर यांचे नावे मराठी मासिक स्वराज दुनिया, श्री समर्थ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, प्रभात थेअटरच्या जवळ, ५३५, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र). द्वारे मुद्रित करुन आणि प्रकाशन ठिकाण : प्रॉपर्टी नं. २५८५, गट नं. १०२६, जुना भांबर्डे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे – ४१२२०९ (महाराष्ट्र).**
**संपादक : शिवाजी बबन खेडकर**

# महापालिकेकडे खड्ड्यांच्या तक्रारींचा पाऊस

■ **आठ दिवसात आल्या इतक्या तक्रारी !**

**पुणे :** शहरातील रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांची तक्रार थेट महापालिकेकडे करण्यासाठी पथ विभागाने तयार केलेल्या 'पीएमसी रोड मित्र' पवर आठ दिवसांतच खड्ड्यांच्या तक्रारींचा पाऊस पडत आहे. प सुरू झाल्यापासून या पवर तब्बल ४५४ तक्रारी आल्या आहेत. यापैकी ३८९ तक्रारींची दखल घेत महपालिकेकडून त्या सोडविण्यात आल्याचा दावा पथ विभागाकडून करण्यात आला आहे. मात्र त्यानंतरही शहरातील अनेक रस्त्यांवरील खड्ड्यांची दुरुस्ती होत नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांच्या तक्रारी आल्यानंतर त्याची तातडीने दखल घेत हे खड्डे बुजविले जात असल्याचे महपालिकेच्या पथ विभागाकडून स्पष्ट केले जात आहे. खड्ड्यांची दुरुस्ती करण्यासाठी पथ विभागाने पथके नेमली असून कनिष्ठ अभियंत्यांकडे रस्त्यांची जबाबदारी देण्यात आली आहे. गेल्या तीन दिवसांपासून शहरात सुरू असलेल्या पावसामुळे महापालिकेच्या वतीने केल्या जाणाऱ्या खड्डे दुरुस्तीच्या कामाचा दर्जा समोर आला आहे. पथ विभागाने दुरुस्त केलेले खड्डे पुन्हा दिसू लागले आहेत. खड्ड्यांमुळे शहरातील अनेक रस्त्यांची चाळण झाली असून, त्यामधून वाहन चालविताना वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे.

महापालिकेच्या पथ विभागाने यापूर्वी दुरुस्त केलेल्या खड्ड्यांमधील खडी बाहेर येत असून रस्त्यावर खडी पसरली आहे. त्यामुळे वाहनचालकांची तारांबळ उडत आहे. रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमध्ये पाणी साठत असल्याने किरकोळ अपघात देखील घडत आहेत. शहरात सांडपाणी वाहून जाण्यासाठी सांडपाणी वाहिनी तसेच ड्रेनेज लाईनची कामे करण्यासाठी अनेक भागांतील रस्ते खोदले होते.

काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यांची डागडुजी करताना योग्य पद्धतीने करण्यात न आल्याने सतत पडत असलेल्या पावसामुळे रस्त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी महापालिकेच्या पथ विभागाने केलेली रस्त्यांची अवस्थाही बिकट झाली असून, त्यावरून ये-जा करताना वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन जावे लागत आहे.

पावसामुळे रस्त्यांवर खड्डे पडल्याचे लक्षात येताच तेथे महापालिकेच्या वतीने डागडुजी करून खड्डे बुजविले जात असल्याचा दावा महापालिकेकडून केला जात आहे. आतापर्यंत महापालिकेने खड्ड्यांच्या तक्रारी करण्यासाठी सुरू केलेल्या पवर विविध भागांतून ४५४ तक्रारी आल्या आहेत. यापैकी ३८९ तक्रारींची दखल घेत त्याचे निवारण महापालिकेने केले आहे. तर ६५ तक्रारींवर काम सुरू असल्याचे पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावस्कर यांनी सांगितले.

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या काळेवाडीतील 'मोफत महाआरोग्य शिबिराला' उत्स्फूर्त प्रतिसाद

## २०० हून अधिक नागरिकांनी घेतला वैद्यकीय विभागाच्या विविध तपासण्या व उपचारांचा लाभ

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या वतीने नागरी आरोग्य पोषण दिनानिमित्त काळेवाडी येथील न्यू जिजामाता रुग्णालयातर्फे 'मोफत महाआरोग्य शिबिराचे' आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. शिबिरामध्ये २०० हून अधिक नागरिकांनी विविध आरोग्य तपासण्या व उपचारांचा लाभ घेतला.

महापालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिराचे उदघाटन महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी केले. याप्रसंगी डॉ. अलवी नासेर, डॉ. शीतल शिंदे, डॉ. जतीन होतवानी, बालरोगतज्ज्ञ डॉ. स्वाती विसपुते व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुप्रिया पाटील, सामाजिक कार्यकर्त्या संगीता कोकणे, अनिता पांचाळ तसेच जिजामाता रुग्णालय व काळेवाडी दवाखान्याचे कर्मचारीही उपस्थित होते.

या शिबिरात नागरिकांसाठी वजन, उंची, शरीर वस्तुमान निर्दे शांक (बीएमआय), सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या, नियमित लसीकरण, छातीचा क्ष-किरण, थुंकी तपासणी, गरोदर मातांची तपासणी तसेच 'आभा' व 'आयुष्मान' कार्ड नोंदणी या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. याशिवाय नागरिकांना बालरोग, स्त्रीरोग, नेत्ररोग, दंतरोग, नाक-कान-घसा तज्ज्ञ व वैद्यकीय अधिकारी (फिजीशियन) यांचे मार्गदर्शन मिळाले. तपासणीनंतर सर्व प्रकारची औषधे नागरिकांना मोफत वाटप करण्यात आली.

दरम्यान, महापालिकेच्या वतीने नागरी आरोग्य पोषण दिनाच्या अनुषंगाने शहरातील विविध भागात मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. नागरिकांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन वैद्यकीय विभागाने केले आहे.

# कुत्र्यांच्या टोळक्याने केला तरुणावर हल्ला; तरुण जखमी

**पिंपरी :** पिंपरी- चिंचवड शहरात कुत्र्यांची दहशत वाढली आहे. दिवसेंदिवस कुत्र्यांच्या हल्ल्याच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. आज पहाटे पाच च्या सुमारास चिखली मोरे वस्ती परिसरात कुत्र्यांनी कामावर जाणाऱ्या तरुणाच्या हाताचा चावा घेऊन ओढून घेऊन जाण्याचा प्रयत्न केला आहे. ही सर्व घटना सीसीटीव्ही कैद झाली आहे.

सविस्तर माहिती अशी , मोरे वस्ती साने कॉलनीत कुत्र्यांच्या टोळक्यांची मोठी दहशत निर्माण झाली आहे. सात कुत्र्यांच टोळकं एकट्या दिसणाऱ्या व्यक्तींवर हल्ला करत आहे. आज पहाटे पाच च्या सुमारास कामावर जात असताना बेसावध असलेल्या व्यक्तीवर कुत्र्यांच्या टोळक्याने हल्ला चढवला. त्या व्यक्तीच्या हाताला कुत्र्यांनी चावा घेतला आहे. घटनेत तरुण जखमी झाला आहे. सात कुत्र्यांनी घेराव घालून पुन्हा चावा घेण्याचा प्रयत्न केला. तरुणाने जीव वाचवण्यासाठी फ्लेक्स बोर्ड आणि दुचाकीचा आसरा घेतला, टोळकं जास्त आक्रमक होत असल्याने त्यांच्या अंगावर दुचाकी ढकलली.

कुत्र्यांचा आवाज आणि तरुणाचा आवाज ऐकून काही जण बाहेर आले. पणे कुत्र्याचं टोळकं तिथंच येरझाऱ्या घालत होत. कुत्र्यांच्या या टोळक्यांची दहशत आणि धास्ती नागरिकांनी घेतली आहे. सकाळी सकाळी उठून शतपावली करणाऱ्या जेष्ठ नागरिक, तरुण भीतीच्या सावटाखाली आहेत. घटनेमुळे कुत्र्यांची दहशत पसरली आहे. महानगर पालिका प्रशासनाने तात्काळ घटनेची दखल घेऊन मोरेवस्ती चिखली परिसरातील कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याबाबत नागरिकांनी मागणी केली आहे.

### गांजा विक्री प्रकरणात उत्तर प्रदेशातील तरुण गजाआड

**पुणे :** गांजा विक्रीसाठी आलेल्या उत्तर प्रदेशातील दोन तरुणांना बाणेर पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून तीन किलो गांजा जप्त करण्यात आला. रवी विजय वर्मा (वय १९), कौशलेंद्र नथूराम वर्मा (वय २३, दोघे सध्या रा. शिव कॉलनी, पिंपळे सौदागर, मूळ रा. भरतकुंभ, जि. चित्रकुट, उत्तर प्रदेश) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. वर्मा बाणेर परिसरात गांजा विक्रीसाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी सापळा लावून दोघांना पकडले. त्यांच्याकडून तीन किलो ४०० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. दोघांविरुद्ध अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींनी गांजा कोठून आणला, तसेच ते कोणाला विक्री करण्याच्या तयारीत होते, यादृष्टीने तपास करण्यात येत आहे. परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त सोमय मुंढे, सहायक आयुक्त विठ्ठल दबडे यांच्या मार्गदर्शनाखाली बाणेर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत, गुन्हे शाखेच्या निरीक्षक अलका सरग, सहायक निरीक्षक डाबेराव, नंदकुमार कदम, अनिल माने, उपनिरीक्षक संदेश माने, शैला पाथरे, सहायक फौजदार सपकाळ, गायकवाड, शिंगे, इंगळे, गाडेकर, खरात, राऊत, भोरे, काळे यांनी ही कामगिरी केली. गुरुवार पेठेतील जैन मंदिर चौकात मेफेड्रोन बाळगणाऱ्या तरुणाला खडक पोलिसांनी पकडले. त्याच्याकडून दोन लाख २५ हजार रुपयांचे ४५ ग्रॅम मेफेड्रोन जप्त करण्यात आले. सुदीपकुमार राजेशकुमार कनोजिया (वय २२, रा. आंबेगाव पठार, धनकवडी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.

# विवाहाच्या आमिषाने महिलेची फसवणूक

■ **विवाहाचे आमिष दाखवून एका महिलेची ३.२३ लाख रुपयांची ऑनलाइन फसवणूक.**

**पुणे :** विवाहाच्या आमिषाने चोरट्याने एका महिलेची तीन लाख २३ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी बाणेर पोलिसांकडून माहिती-तंत्रज्ञान कायदा आणि फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एका महिलेने बाणेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला बाणेर भागात राहायला आहेत. चोरट्याने महिलेच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला होता. पुतण्याचा विवाह करायचा आहे, असे चोरट्याने महिलेला सांगितले होते. आरोपीने एका नामवंत इलेक्ट्रॉनिक कंपनीत कामाला असल्याची बतावणी केली होती. त्यानंतर महिलेला जाळ्यात ओढून विवाहसाठी काही इलेक्ट्रॉनिक वस्तू खरेदी करायच्या आहेत, असे सांगून महिलेकडून वेळोवेळी तीन लाख २३ हजार रुपये ऑनलाइन पद्धतीने घेतले.

महिलेने पैसे जमा केल्यानंतर तिला इलेक्ट्रॉनिक वस्तू देण्यात आल्या नाहीत. महिलेने मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला. तेव्हा मोबाइल क्रमांक बंद असल्याचे लक्षात आले. महिलेने नुकतीच बाणेर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात येत आहे.

**ज्येष्ठ महिलेची ४६ लाखांची फसवणूक**

शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने ज्येष्ठ महिलेची ४६ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला कर्वेनगर भागात राहायला आहेत.

# खरेदीसाठी आलेल्या महिलांकडील ऐवज चोरीच्या घटनांमध्ये वाढ

**पुणे :** लक्ष्मी रस्त्यावर खरेदीसाठी आलेल्या महिलेच्या पिशवीतून दोन लाख रुपयांचे मंगळसूत्र चोरट्यांनी लांबविल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत एका महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला पिंपरी-चिंचवड परिसरात राहायला आहेत. त्या गुरुवारी (२१ ऑगस्ट) लक्ष्मी रस्त्यावरील एका वस्त्रदालनात खरेदीसाठी आल्या होत्या. बेलबाग चौकात गर्दी होती. महिलेने तिचे मंगळसूत्र पिशवीत ठेवले होते. चोरट्यांनी गर्दीत पिशवीची चेन उघडून दोन लाख रुपयांचे मंगळसूत्र लांबविले. खरेदी केल्यानंतर महिलेने पिशवीची पाहणी केली. तेव्हा पिशवीतून मंगळसूत्र चोरीला गेल्याचे उघडकीस आले. पोलीस कर्मचारी पडघमकर तपास करत आहेत.

तुळशीबाग, रविवार पेठेतील कापडगंज परिसरात खरेदीसाठी आलेल्या महिलांकडील दागिने आणि रोकड लांबविण्यात आल्याच्या घटना नुकत्याच घडल्या. खरेदीसाठी आलेल्या महिलांच्या पिशवीतून दागिने चोरीला जाण्याची ही चौथी घटना आहे.

# ताम्हिणीत केवळ चार दिवसांतच 1 हजार मिमीपेक्षा अधिक पाऊस

**पुणे :** गेल्या तीन-चार दिवसांत पुणे जिल्ह्याच्या घाटमाथ्याला पावसाने झोडपले. त्यात ताम्हिणी येथे २० ऑगस्ट रोजी एका दिवसातील विक्रमी पाऊस पडला. त्याशिवाय केवळ चार दिवसांत ताम्हिणी येथे सुमारे एक हजार मिलीमीटर पाऊस नोंदवला गेला आहे.

बंगालचा उपसागर, अरबी समुद्रातील प्रणालीमुळे अनुकूल स्थिती निर्माण होऊन १८ ते २० ऑगस्ट या तीन दिवसांत राज्यात सर्वदूर जोरदार पाऊस पडला. काही ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली. हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार ताम्हिणी येथे २१ ऑगस्ट रोजी २०० मिलिमीटर, २० ऑगस्ट रोजी ५७५ मिलिमीटर, १९ ऑगस्ट रोजी ३२० मिलीमीटर, तर १८ ऑगस्ट रोजी ७५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. त्यामुळे चार दिवसांतच ताम्हिणी येथे १ हजार १७० मिलिमीटर पाऊस नोंदवला गेला आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाचे शास्त्रज्ञ एस. डी. सानप म्हणाले, बंगालच्या उपसागरात तयार झालेली प्रणाली मोसमी वाऱ्यांसाठी उपयुक्त ठरते. ताम्हिणी हे ठिकाण सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर आहे. बाष्प घेऊन येणारे मोसमी वारे सह्याद्री घाटमाथ्यावर अडवले जाऊन पाऊस पडतो.

### प्रेमाला विरोध केल्याने अल्पवयीन मुलाकडून साथीदारांच्या मदतीने तरुणाचा खून

**पुणे :** प्रेमाला विरोध केल्याने अल्पवयीन मुलाने साथीदारांच्या मदतीने प्रेयसीच्या मानलेल्या भावाचा निर्घृण खून केल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी ग्रामीण पोलीस दलाच्या राजगड पोलिसांकडून तिघांना अटक करण्यात आली असून, तीन अल्पवयीनांना ताब्यात घेतले आहे. जुन्या कात्रज बोगद्याजवळील डोंगरावर कात्रजमधील तरुणाचा खून करण्यात आला होता. या प्रकरणाचा राजगड पोलिसांनी तपास करून गुन्ह्याचा छडा लावला. सौरभ स्वामी आठवले (वय २५, रा. पंचरत्न सोसायटी, मांगडेवाडी, कात्रज) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे.

# पुरंदर विमानतळ विरोध, जिल्हा प्रशासनाचा महत्वाचा निर्णय

**पुणे :** पुरंदर तालुक्यातील सात गावांमध्ये प्रस्तावित असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी एकूण जागेपैकी निम्मी जागा पहिल्या टप्प्यात संपादित करण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. सात हजार एकरपैकी सुमारे तीन हजार एकरचे क्षेत्र आता संपादित केले जाणार असून, २५ ऑगस्टपासून या गावांतील शेतकऱ्यांची संमतीपत्रे घेण्यास सुरुवात केली जाणार आहे.

पुरंदर येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारला जाणार आहे. या विमानतळासाठी प्रकल्पाला जागा देण्यासाठी सात गावांतील काही शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला आहे. हा विरोध लक्षात घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाने जागेचे संपादन करण्याचा निर्णय पहिल्या टप्प्यात घेतला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय तसेच पुरंदरच्या उपविभागीय कार्यालयांमध्ये शेतकऱ्यांची संमतीपत्रे स्वीकारली जाणार आहेत.

पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी पारगाव मेमाणे, खानवडी, मुंजवडी, एखतपूर, कुंभारवळण, वनपुरी, उदाचीवाडी या सात गावांमधून २८३२ हेक्टर जमीन संपादन करण्याचे नियोजन होते. या संदर्भात महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाने (एमएडीसी) २८३२ हेक्टर जमीन संपादन करण्याचे पूर्वी प्रस्ताव दिला होता. आता शेतकऱ्यांचा वाढता विरोध लक्षात घेता हे क्षेत्र कमी करण्याचा इरादा जाहीर केल्याचे दिसून येत आहे. त्याबाबत महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) जिल्हा प्रशासनाला पत्र पाठवून एकूण प्रस्तावित २८३२ हेक्टरपैकी १२८५ हेक्टर म्हणजेच सुमारे तीन हजार एकर जागा संपादित करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

जिल्हा प्रशासनाने येत्या सोमवारपासून (२५ ऑगस्ट) सात गावांतील शेतकऱ्यांची संमतीपत्रे घेण्यास सुरुवात करण्याचे ठरविले आहे. विमानतळासाठी जमीन देणाऱ्यांना बाजारभावानुसार चार पट मोबदला देण्याचे नियोजन आहे. जे जमीन देण्यासाठी संमती देणार आहे, त्यांना जमिनीचा परतावा देण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे.

# अपघाती मृत्यू रोखण्यावर भर द्यावा – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

■ **पदोन्नत अधिकाऱ्यांचा पद अलंकरण सोहळा**

**मुंबई :** विभागाच्या आतापर्यंतच्या इतिहासात पहिल्यांदाच ३३१ सहाय्यक मोटार वाहन निरीक्षकांना मोटार वाहन निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. पदोन्नतीने अधिकारांबरोबरच जबाबदारीमध्येही वाढ झाली आहे. पदोन्नत अधिकाऱ्यांनी राज्यात रस्ता सुरक्षा वाढवून अपघाती मृत्यू रोखण्यावर भर देण्याचे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

मोटार वाहन निरीक्षकपदी पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांच्या गणवेशावर नव्या पदाचे चिन्ह लावून पदभार स्वीकारण्याचा समारंभ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह येथे आयोजित करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना परिवहन मंत्री श्री सरनाईक बोलत होते. कार्यक्रमाला परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, अतिरिक्त परिवहन आयुक्त भरत कळसकर, सह परिवहन आयुक्त संजय मेहेंत्रेवार, जयंत पाटील, प्रादेशिक परिवहन अधिकारी संदेश चव्हाण, विनोद सागवे आदी उपस्थित होते.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, एस. टी. महामंडळाच्या माध्यमातून तळागाळातील नागरिकांची सेवा करण्यात येते. राज्यात पाचव्या क्रमांकावर महसूल मिळवून देणारा हा विभाग असून विभागामध्ये आमूलाग्र सुधारणा करण्यात येत आहेत. पदोन्नत झालेल्या ३३१ सहाय्यक मोटार वाहन निरीक्षकच्या रिक्त जागांवर नवीन उच्च शिक्षित उमेदवारांना संधी मिळणार आहे. त्यामुळे विभागात आणखी उच्च शिक्षित व तंत्रज्ञानस्नेही मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे.

राज्यातील रस्ते अपघात रोखण्यासाठी गतिरोधक मुक्त यंत्रणा विकसित करावी. तसेच एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्याबरोबरच अपघात प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. तसेच रस्त्यांवर दिशादर्शक फलकांची संख्या वाढविण्यात यावी. अपघात होऊच नये अशी व्यवस्था निर्माण करावी. पदोन्नत झालेल्या अधिकाऱ्यांनी विभागाची प्रतिमा नेहमी उज्ज्वल ठेवण्याची दक्षता बाळगावी असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

परिवहन आयुक्त विवेक भीमनवार म्हणाले, पदोन्नतीने जबाबदारीत वाढ झाली आहे. वाहनांची संख्या, तंत्रज्ञान वाढत आहे. मोटार वाहन निरीक्षक हे विभागाची ओळख आहे. त्यामुळे आपली जबाबदारी जास्त आहे. परिवहन विभागाच्या सेवांची तुलना अन्य प्रगत देशाशी होत आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर असलेल्या सेवांची नागरिकांची अपेक्षा आहे. नागरिकांच्या उंचावलेल्या अपेक्षापूर्तीसह अपघातांची संख्या रोखण्याचे आव्हान विभागासमोर आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अपघातांची संख्या रोखण्यावर भर देण्यात येत आहे. भारतातील सर्वात मोठी आयटीएमएस (इंटरनेटेड ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट सिस्टीम) प्रणाली उभारत आहेत. अपघाती मृत्यू मागील दोन वर्षापासून कमी होत आहे. रस्ता सुरक्षा ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे.

# महिला सक्षमीकरणाद्वारे राज्य विकासपथावर अग्रेसर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई** - राज्यभर रक्षाबंधनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला असून मुख्यमंत्री म्हणून मला आतापर्यंत ३६ लाखांहून अधिक भगिनींनी राख्या पाठविल्या आहेत. यामध्ये बहिणींचे निस्सीम प्रेम आणि आशीर्वाद आहेत. महिलांना सक्षम बनविण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनामार्फत विविध योजना राबविल्या जात असून महिला सक्षमीकरणाद्वारे राज्य विकासपथावर अग्रेसर राहिल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून भगिनींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राख्या पाठविल्या, रक्षाबंधनाचा हा कार्यक्रम दादर येथील योगी सभागृहात आयोजित करण्यात आला. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे, स्थानिक लोकप्रतिनिधी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचे उद्दिष्ट समोर ठेवले असून हा विकास महिलांच्या सहभागाशिवाय शक्य नसल्याचे सांगून पंतप्रधानांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून 'बेटी बचाव' पासून 'लखपती दीदी' पर्यंत अनेक योजना राबविल्या आहेत. लखपती दीदी योजनेच्या माध्यमातून राज्यात मागील वर्षी २५ लाख भगिनी लखपती बनल्या असून राज्य देशात पहिल्या क्रमांकावर आहे. यावर्षीही तितक्याच महिला लखपती बनणार असून एक कोटी भगिनींना 'लखपती दीदी' बनविण्याचे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून राज्यात १५०० रुपयांच्या निधीतून भगिनी स्वावलंबनाचे नवे मार्ग शोधत असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केला. महिला सक्षम झाल्या तर परिवार आणि समाज सक्षम होतो. महिलांच्या आर्थिक क्रियाशीलतेवर प्रकाश टाकताना विविध माध्यमांतून महिलांना दिलेले कर्ज शंभर टक्के वसूल झाले असल्याचे त्यांनी सांगितले. शासन लवकरच महिला सहकारी संस्थांना हक्काचे काम देणार आहे. उद्योग, व्यवसाय, क्षेत्रांत महिलांना प्रोत्साहन देण्यात येत असून राज्यात येत्या पाच वर्षांत महिलांसाठीची एकही योजना बंद होणार नाही, असेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील शेवटच्या घटकाच्या कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार म्हणाले, महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. यावेळी आमदार रवींद्र चव्हाण, चित्रा वाघ यांनीही मनोगत व्यक्त केले.

# महागणेशोत्सवात सर्व नागरिकांनी सहभागीता नोंदवा – मंत्री ॲड.आशिष शेलार यांचे आवाहन

■ **महागणेशोत्सव राज्य उत्सवानिमित्त गीत आणि पोर्टलचे लोकार्पण**

मुंबई, दि. २३ : सार्वजनिक गणेशोत्सव, घरगुती गणेशोत्सव, महाराष्ट्रातील गणेशोत्सवाला आता राज्याने प्रथमच महाराष्ट्र राज्याचा राज्य महोत्सव म्हणून घोषित केला आहे. त्यानिमित्ताने सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत असणाऱ्या विभागांनी विविध उपक्रम, कार्यक्रम, उत्सव तसेच स्पर्धेचे आयोजन केले आहे. याचाच भाग म्हणून राज्यातील प्रत्येक नागरिकास घरगुती तसेच सार्वजनिक गणेशोत्सवाचे दर्शन मिळावे, यासाठी र्हीींिी:// सरपशीर्हेीररी.श्रिवाङ्गर.ले.ळप या पोर्टलची निर्मिती करण्यात आली असून सामान्य नागरिकांनी तसेच दिव्यांग बांधवांनी याद्वारे घरबसल्या दर्शनाचा लाभ घ्यावा आणि आपली सहभागीता नोंदवावी, असे आवाहन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी केले.

मंत्री ड.शेलार यांच्या हस्ते एमएसआरडीसी, वांद्रे येथे 'आला रे आला राज्य महोत्सव आला' या गीताचे आणि https:// ganeshotsav.pldmka.co.in/ या पोर्टलचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटिया, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभिषण चवरे तसेच पत्रकार उपस्थित होते.

मंत्री ड.शेलार म्हणाले की, महाराष्ट्र राज्य सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा आता तालुकास्तरापर्यंत विस्तारित करण्यात आला असून विजेत्यांना देण्यात येणाऱ्या पोरितोषिकांच्या रकमांमध्येही भरघोस वाढ करण्यात आली आहे.

# पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धा सर्व विभागांनी समन्वयाने काम करुन यशस्वी करावी - उपमुख्यमंत्री

**पुणे** - पुणे ग्रँड चॅलेंज टूर, सायकल स्पर्धेच्या संदर्भात सर्व विभागांनी आपल्या कामकाजाचे सूक्ष्म नियोजन करून समन्वयाने काम करून स्पर्धा यशस्वी करावी. असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित,पुणे ग्रँड चॅलेंज टूर सायकल स्पर्धेत संदर्भात आढावा बैठकीत श्री. पवार बोलत होते.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय चौबे, महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, क्रीडा आयुक्त शीतल उगले,जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पी एम आर डी ए चे महानगर आयुक्त योगेश म्हसे, पोलीस अधिक्षक संदिपसिंह गिल्ल, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले, पुणे ग्रँड चॅलेंज टूर ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा असून पुण्यात ही स्पर्धा प्रथमच होत आहे. या स्पर्धेच्या उत्तम प्रकारे आयोजनासाठी सर्वांनी सहकार्य करावे, या संदर्भात विभागीय आयुक्त यांनी दर १५ दिवसांनी बैठक घेऊन कामकाजाच्या प्रगतीचा आढावा घ्यावा, शासनासाठी हा एक महत्त्वाचा उपक्रम असून याचे उत्तम प्रकारे आयोजन करण्याची जबाबदारी सर्व यंत्रणांवर आहे

# छत्रपती संभाजीनगर शहर पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून शाश्वत पाणीपुरवठा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर शहर पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून पुढील २५-३० वर्षे शहराच्या अपेक्षित लोकसंख्येला शुद्ध व सातत्यपूर्ण पाणीपुरवठा देता येईल अशी योजना पूर्णत्वाकडे जात आहे. २६ द.ल.ली. हा या योजनेतील एक टप्पा आहे. उर्वरित कामेही वेळेत पूर्ण करून शहराला ३६५ दिवस २४द७ शाश्वत पाणीपुरवठा करता होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला.

फारोळा येथे २६ द.ल.ली. क्षमता असलेल्या जलशुद्धीकरण केंद्राचे जलपूजन मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते आज झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री आणि संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण आणि दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, खासदार संदिपान भुमरे, खासदार डॉ. कल्याण काळे, खासदार डॉ.भागवत कराड, आमदार नारायण कुचे, आमदार प्रदीप जयस्वाल, आमदार अनुराधा चव्हाण, आमदार संजय केणेकर, आमदार सतीश चव्हाण, माजी महापौर नंदकुमार घोडेले, किशोर शितोळे, राजेंद्र जंजाळ, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, महानगर पालिका आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, छत्रपती संभाजीनगर शहरासाठी २०१९ मध्ये सुरू झालेल्या या पाणीपुरवठा योजनेला सुरूवातीला १८०० कोटींची मंजुरी मिळाली, महानगरपालिकेचा आर्थिक हिस्सा शासनाने उचलण्याचा निर्णय घेऊन या योजनेला गती दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नव्याने सुरू केलेल्या अटल अमृत योजनेत या योजनेचा समावेश करण्यात आला.

# स्वच्छ सर्वेक्षणमध्ये अव्वल स्थान मिळवण्यासाठी महानगरपालिकेसोबत सर्वांचे एकत्रितपणे प्रयत्न आवश्यक

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहराची ओळख ही औद्योगिक नगरी तसेच कामगारांची, कष्टकऱ्यांची नगरी म्हणून देखील आहे. परंतु आता पिंपरी चिंचवड शहराला स्वच्छ, हरित आणि समृद्ध शहर आपल्याला बनवायचे आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ मध्ये या शहराला अव्वल स्थान मिळवण्यासाठी महापालिकेसोबत लोकप्रतिनिधी, नागरिक, स्वयंसेवी संस्था अशा सर्वांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले,यासाठी राज्य सरकारकडून आवश्यक ती मदत देण्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

भारत सरकारच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत घेतलेल्या स्वच्छ सर्वे क्षण २०२४-२५ मध्ये पिंपरी चिंचवड शहर देशात सातवे तर राज्यात प्रथम क्रमांकाचे शहर ठरले आहे. याशिवाय शहराला ७ स्टार कचरामुक्त शहर व वॉटर-प्लस प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. याबद्दल पिंपरी चिंचवड महापालिकेला केंद्र शासनाने पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. या यशामध्ये सहभाग घेऊन योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान व स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ च्या पुर्वतयारीचा प्रारंभ आज चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते झाला.

# कृषी विभागाच्या योजनांची माहिती अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा

**पुणे :** शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून कृषी विभागाने त्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले असून क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांनी कृषी विभागाच्या योजनांची माहिती अधिकाधिक गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी, अशा सूचना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिल्या. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्था येथे आयोजित राज्यस्तरीय आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त डॉ. हेमंत वसेकर, संचालक अशोक किरनळ्ळी, अंकुश माने तसेच उपसचिव, राज्यातील प्रकल्प संचालक, उपसंचालक, विभागीय सहसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, सहसंचालक व कृषी आयुक्तालयातील कर्मचारी उपस्थित होते. कृषीमंत्री श्री. भरणे म्हणाले, कृषी विभाग शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. अधिकाऱ्यांनी योजनांमधील बारकावे लक्षात घेऊन योजनांचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांना मिळेल याची काळजी घ्यावी. क्षेत्रीय स्तरावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पाठीशी शासन नेहमीच असेल. काम करताना येणाऱ्या अडचणी सोडवल्या जातील. परंतु कामात कुचराई करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई केली जाईल.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या 'मी विकासयात्री' पुस्तकाचे प्रकाशन

■ **'डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी हे केवळ प्रशासक नव्हे तर एक विकासयात्री' - अजित पवार**

**पुणे :** ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी हे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. लोकांच्या सहभागातून शासनाच्या योजना कशा यशस्वी होऊ शकतात हे त्यांनी दाखवून दिले. त्यामुळे ते केवळ प्रशासक नव्हते तर एक विकासयात्री होते, अशा शब्दात उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी डॉ. कलशेट्टी यांचा गौरव केला.

यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी लिखित 'मी विकासयात्री' या पुस्तकाच्या बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्य वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ. नितीन करीर, यशदाचे अतिरिक्त महासंचालक डॉ. शेखर गायकवाड, महाराष्ट्र राज्याच्या आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री डॉ. पोपटराव पवार, अखिल भारतीय मराठी संमेलनाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख आदी यावेळी उपस्थित होते.

डॉ. कलशेट्टी हे प्रशासनात मनापासून, जीवन ओतून काम करणारे हळव्या मनाचे व्यक्ती आहेत, असे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, डॉ. कलशेट्टी यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात ग्रामविकास, ग्रामस्वच्छता यासह लोकाभिमुख अशा योजना चांगल्या प्रकारे राबविण्याचे काम केले आहे. ते गावोगावी फिरले, लोकांच्या समस्या जाणून घेतल्या. लोकाभिमुख काम करत असताना तसेच योजना राबवत असताना प्रशासनात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची मोठी गरज असते. डॉ. कलशेट्टी यांनी हे दाखवून दिले असून त्यांनी स्वच्छता मोहिमेत जिल्हा परिषदा, तालुका पंचायती, ग्रामपंचायती, समाजातील प्रत्येक घटकाला स्वच्छतेच्या कामात त्यांनी सहभागी करून घेतले.

यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी डॉ. कलशेट्टी यांनी संत गाडगेबाब ग्रामस्वच्छता अभियान, निर्मल ग्राम अभियान आदी उपक्रमांत केलेल्या कामाच्या आठवणी सांगून चांगल्या कामाच्या आठवणी समाज विसरत नाही, असेही ते म्हणाले. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील विकासाचे वर्णन 'मी विकासयात्री' या पुस्तकात करण्यात आले आहे. डॉ. कलशेट्टी यांनी कोविड परिस्थितीत कोविड जनजागृतीचे कामही चांगल्या प्रकारे केले. त्यांनी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या प्रमुखपदावर असताना त्यांनी राज्यस्तरीय पाणी गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा, राज्य भूजल माहिती केंद्र सुरू करण्याचे काम केले.